अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

संपादक
अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. 28 मे 2026 | वर्ष 11 वे | अंक 42 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

# यंदाचा मे महिना ११४ वर्षातील दुसरा उष्ण महिना


## ब्रम्हपुरी यावर्षी सर्वात हॉट, राज्यात पुढील पाच दिवस उष्णतेची लाट

ब्रम्हपुरी/का.प्र.

राज्य शासनाच्या गॅझेटिअरच्या अधिकृत नोंदीप्रमाणे १६ मे १९१२ रोजी राज्यातील चंद्रपूर शहराचे तापमान आजवरचे सर्वाधिक ४८.३ अंश सेल्सिअस इतके नोंदले गेले. त्यानंतर दुसऱ्या क्रमांकाचे विक्रमी तापमान चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी येथे यंदा २४ मे २०२६ रोजी ४७.६ अंश इतके होते. हा तापमानाचा उच्चांक सुमारे ११४ वर्षांनी दुसऱ्यांदा नोंदविला गेला.

राज्यात पुढील पाच दिवस विदर्भासह काही भागांत उष्णतेची लाट कायम राहणार असल्याचा इशारा भारतीय हवामान विभागाने दिला आहे. नागपूर, चंद्रपूर, अकोला, अमरावती आणि वर्धा जिल्ह्यांत तीव्र उष्णतेमुळे रेड किंवा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. गेल्या शंभर वर्षांतील ३६ जिल्ह्यांच्या तापमानाचा ताळेबंद तपासला असता असे लक्षात येते की, मार्च ते मे या तीन महिन्यांत मे महिना आजवर सर्वांत उष्ण ठरला आहे. विदर्भाचा पारा उन्हाळ्यात दरवर्षी ४५ अंशांवर जातो. तेथे मे महिन्यात हे तापमान सामान्य समजले जाते.

राज्याचा पारा फक्त एकदा ४८ अंशांवर गेला आहे. यंदा सलग आठ दिवसांपासून ब्रह्मपुरी, वर्धा, अमरावती, अकोला या शहरांचे तापमान सतत ४६ ते ४७ अंशांवर जात आहे. २४ मे २०२६ रोजी ब्रह्मपुरीचा पारा ४७.६ अंशांवर गेल्याने गत ११४ वर्षांतील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वाधिक तापमान नोंदले गेले.



### तापमानवाढीची कारणे काय ?

- हवामान बदल, जंगल, हरित क्षेत्र कमी होणे.
- शहरीकरण, जमिनीतील आर्द्रता कमी होणे
- अल निनोचा प्रभाव,
- दीर्घकाळ कोरडे वातावरण

### यंदाचे राज्यातील सर्वांत उष्ण जिल्हे...

| | | |
|---|---|---|
| विदर्भ : | अकोला, अमरावती, वर्धा, चंद्रपूर | ४५ ते ४७.६° |
| मराठवाडा : | परभणी, जालना, बीड, नांदेड | ४१ ते ४४° |
| पश्चिम महाराष्ट्र : | पुणे, सोलापूर, सांगली | ३८ ते ४३° |
| उत्तर महाराष्ट्र : | जळगाव, धुळे | ४३ ते ४४° |
| कोकण : | मुंबई, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | ३३ ते ३६° |

# गोसेखुर्द प्रकल्पग्रस्तांचे शुक्रवारला 'घेरा डालो' आंदोलन

## प्रलंबित समस्या सोडविण्याची मागणी, ४ दिवसांचा अल्टिमेटम

ब्रम्हपुरी/का.प्र.

गोसेखुर्द प्रकल्पासाठी जमिनी देऊनही हक्काच्या मोबदल्यासाठी वणवण भटकणाऱ्या शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आता ठिणगी पडली आहे. 'शेतकऱ्यांचा प्रलंबित मोबदला त्वरित द्या आणि कालव्यांच्या दुरुस्तीतील प्रशासकीय दिरंगाई थांबवा, अन्यथा आपल्या कार्यालय समोर दिनांक २९ मे २०२६ रोजी विशाल धरणे व घेरा डालो तीव्र आंदोलन छेडले जाईल,' असा इशारा भारतीय



कम्युनिस्ट पक्षाचे नेते कॉ. विनोद झोडगे पाटील यांनी दिला आहे. सोमवार, २५ मे रोजी सायघाटा येथील गोसेखुर्द उजवा कालवा विभाग कार्यालयावर धडक देऊन ठग मॅडम यांच्या मार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन सादर करण्यात आले.

यावेळी कॉ. झोडगे पाटील यांनी प्रशासनाच्या अनास्थेवर कडक शब्दांत ताशेरे ओढले. १९८४ पासून सुरू असलेल्या या प्रकल्पात शेतकऱ्यांच्या जमिनी कवडीमोल दराने घेण्यात आल्या. आता 'वाढीव मोबदला' देण्याचे आमिष दाखवून शेतकऱ्यांकडून कागदपत्रे गोळा केली जात आहेत. या प्रक्रियेत प्रत्येक शेतकऱ्याचे १५ ते २० हजार रुपये खर्च झाले असून, ३०० रुपयांच्या नोटरीसाठी वकिलांमार्फत ३००० रुपये उकळले जात असल्याचा खळबळजनक आरोप त्यांनी केला. 'हा आर्थिक भ्रष्टाचार कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहे?' असा संतप्त सवालही त्यांनी यावेळी उपस्थित केला.

जमिनी देऊनही पिढ्यानपिढ्या उलटल्या, तरी शेतकऱ्यांच्या शेतात पाणी पोहोचलेले नाही. निकृष्ट कामामुळे कालवे फुटण्याचे सत्र सुरू असून, हळदा B-४ कालव्याची पाळ अद्याप दुरुस्त झालेली नाही. कालव्यांमध्ये गाळ आणि झाडे-झुडपे वाढल्याने टेलच्या शेतकऱ्यांपर्यंत पाणी पोहोचणे कठीण झाले आहे. पावसाळा तोंडावर असतानाही साफसफाईची कामे न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

प्रशासनाने ४ दिवसांत ठोस पावले उचलली नाहीत, तर २९ मे २०२६ रोजी भारतीय कम्युनिस्ट पक्ष आणि शेतकऱ्यांच्या वतीने गोसेखुर्द उजवा कालवा विभाग सायगाटा या कार्यालयाला समोर विशाल धरणे व 'घेरा डालो' आंदोलन करण्यात येईल, असा इशारा कॉम्रेड विनोद झोडगे पाटील यांनी निवेदनातून दिला आला आहे. यावेळी चांदली चे माजी सरपंच संदीप बगमारे, दिनेश नाकाडे, गजानन घोरमोडे, धनंजय नाकतोडे, नामदेव बोरघर, संजय गेटबर, माधव मेश्राम, ओमप्रकाश घोरमोडे, नंदू ढोरे, प्रियंका तलमले, शंकर तलमले, शिवराम दोनाडकर यांच्यासह ब्रम्हपुरी तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




झाडे लावा, झाडे जगवा...

## संपादकीय...

# मोदी सरकारमध्ये बदलाचे संकेत!

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या तिसऱ्या कार्यकाळाला दोन वर्षे पूर्ण होण्याच्या उंबरठ्यावर देशाचे राजकारण उभे आहे. विशेष म्हणजे, या काळात केंद्र सरकारचा एकदाही मंत्रिमंडळ विस्तार झालेला नाही. भारतीय राजकारणाच्या दृष्टीने ही बाब अपवादात्मक मानावी लागेल. कारण, सत्तेच्या समीकरणात बदल, मित्रपक्षांच्या अपेक्षा, निवडणुकांचे गणित आणि प्रशासनातील कार्यक्षमतेचा आढावा या सर्व घटकांमुळे केंद्रातील मंत्रिमंडळात फेरबदल अपरिहार्य मानले जातात. त्यामुळेच मोदी सरकारच्या संभाव्य विस्ताराची चर्चा आता पुन्हा एकदा वेगाने सुरू झाली आहे. सेवातीर्थ येथे नुकतीच पार पडलेली मंत्रिपरिषदेची बैठक या चर्चेला अधिक खतपाणी घालणारी ठरली. जवळपास वर्षभरानंतर झालेल्या या बैठकीत केवळ प्रशासकीय आढावा घेण्यात आला नाही, तर प्रत्येक मंत्रालयाच्या कामगिरीचे मूल्यमापन करण्यात आले. मंत्रालयांना 'ए प्लस'पासून इतर श्रेणींमध्ये विभागून त्यांच्या कामाचे विश्लेषण करण्यात आले, ही बाब विशेष लक्षवेधी ठरली. यावरून मोदी सरकार आता केवळ राजकीय संतुलन नव्हे, तर कार्यक्षमतेलाही तितकेच महत्त्व देत असल्याचे स्पष्ट होते.

नितीन गडकरी, जे. पी. नड्डा, मनोहरलाल खट्टर, प्रल्हाद जोशी आणि किशन रेड्डी यांच्या मंत्रालयांना सर्वोत्तम मानांकन मिळाल्याची चर्चा आहे. दुसरीकडे, काही मंत्रालयांमध्ये बदलाची आवश्यकता व्यक्त करण्यात आली आहे. यावरून आगामी विस्तार हा केवळ मित्रपक्षांना खूश करण्यापुरता मर्यादित राहणार नसून 'परफॉर्मन्स ऑडिट'च्या आधारावरही निर्णय घेतले जाणार असल्याचे संकेत मिळत आहेत. यामागे राजकीय आणि आर्थिक अशी दुहेरी पार्श्वभूमी आहे. इराण-इस्रायल संघर्षामुळे पश्चिम आशियात निर्माण झालेला तणाव, तेलाच्या वाढत्या किंमती, महागाई आणि जागतिक आर्थिक अनिश्चितता यामुळे केंद्र सरकारवर दबाव वाढत आहे. अशा परिस्थितीत प्रशासन अधिक गतिमान आणि परिणामकारक करण्याची गरज सरकारला जाणवत आहे. मंत्र्यांना परदेश दौरे कमी करून थेट जनतेमध्ये जाण्याच्या दिलेल्या सूचना याच दृष्टिकोनातून पाहाव्या लागतील. मात्र, या विस्ताराचा खरा केंद्रबिंदू राजकीय आहे. भाजपला आता केवळ स्वतःच्या ताकदीवर नव्हे, तर मित्रपक्षांच्या आधारावर सत्ता टिकवावी लागत आहे. तेलगू देसम पक्षाचे चंद्राबाबू नायडू, जनता दल (युनायटेड) चे नितीशकुमार, शिवसेनेचे एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील अजित पवार गट यांच्यासारखे सहयोगी पक्ष मंत्रिमंडळात अधिक प्रतिनिधित्वाची अपेक्षा बाळगून आहेत. त्यामुळे विस्तार करताना भाजपला मित्रपक्षांचे समाधान आणि स्वतःचे राजकीय वर्चस्व यामध्ये संतुलन साधावे लागणार आहे.

यापुढे परिस्थिती आणखी गुंतागुंतीची होऊ शकते. भाजप सध्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा विस्तार करण्याच्या रणनीतीवर काम करत असल्याचे दिसते. शरद पवार, उद्धव ठाकरे, झारखंड मुक्ती मोर्चा आणि काही प्रादेशिक पक्षांशी सुरू असलेले संपर्क हे त्याचेच संकेत आहेत. भारतीय राजकारणात सत्तेच्या समीकरणांना कायमस्वरूपी मित्र वा शत्रू नसतात, हे पुन्हा एकदा स्पष्ट होत आहे. जर भाजपला या पक्षांपैकी काहींना आपल्या बाजूला वळविण्यात यश आले तर मंत्रीमंडळातील जागांचे गणित पूर्णपणे बदलू शकते. अशा परिस्थितीत गेली अनेक वर्षे मंत्रीपद भूषवणाऱ्या काही ज्येष्ठ नेत्यांना संघटनात्मक जबाबदाऱ्या देण्याचा मार्ग स्वीकारला जाऊ शकतो. मोदी सरकारमध्ये अनेक वरिष्ठ मंत्री सत्तरी ओलांडलेले आहेत. त्यामुळे 'जनरेशन शिफ्ट'ची शक्यताही नाकारता येत नाही.

याचवेळी आगामी विधानसभा निवडणुकांचाही विचार महत्त्वाचा आहे. उत्तर प्रदेश, उत्तराखंड, गुजरात यांसारख्या राज्यातील निवडणुका भाजपसाठी अत्यंत महत्त्वाच्या ठरणार आहेत. त्यामुळे त्या राज्यांतील सामाजिक, जातीय आणि प्रादेशिक समीकरणांचा विचार करून मंत्रिमंडळाची रचना केली जाण्याची शक्यता आहे. उत्तर प्रदेशातील प्रतिनिधित्व, महाराष्ट्रातील सत्तासमीकरण आणि दक्षिण भारतातील विस्तार या तिन्ही गोष्टी भाजपसाठी निर्णायक ठरू शकतात. या संभाव्य विस्ताराचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे प्रशासनातील उत्तरदायित्व. मोदी सरकारने मंत्रालयांच्या कामगिरीचे डेटा-आधारित मूल्यमापन, कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल मॉनिटरिंग आणि तक्रार निवारण प्रक्रियेला प्राधान्य दिले आहे. यामुळे भविष्यातील मंत्रिमंडळ केवळ राजकीय निष्ठेवर नव्हे, तर कार्यक्षमतेवरही मोजले जाईल, अशी शक्यता निर्माण झाली आहे.

# गोवंश तस्करीचा पर्दाफाश, ४ आरोपींना अटक

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी पोलीस स्टेशन हद्दीतील गांगलवाडी-एकारा मार्गावरून गोवंशीय जनावरांची



अवैध तस्करी केली जात असल्याची खात्रीशीर गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ पावले उचलत पंचांसमक्ष या मार्गावर सापळा रचला. संशयास्पद वाटणारे ट्रक क्रमांक MH 49 AT 8332 आणि ट्रक क्रमांक MH 27 DT 1542 यांना पोलिसांनी थांबवून त्यांची तपासणी केली.पोलिसांनी दोन्ही वाहनांची तपासणी केली. दोन्ही ट्रकमध्ये प्रत्येकी १० याप्रमाणे एकूण २० गोवंशीय जनावरे दाटीवाटीने कोंबली होती. यावरून हा गोवंश तस्करीचा अवैध प्रकार असल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी दोन्ही वाहने आणि २० गोवंशीय जनावरे ताब्यात घेतली आहेत. या जप्त केलेल्या संपूर्ण मुद्देमालाची अंदाजे किंमत रु. ९,४५,०००/- (नऊ लाख पंचेचाळीस हजार रुपये) इतकी आहे.

पोलिसांनी घटनास्थळावरून भूषण तिरुपती जम्पलवार (वय ३२, रा. घुटकाळा तलाव, चंद्रपूर), गणेश रमेश गोहणे (वय २८, रा. चिखली, ता. मूल, जि. चंद्रपूर), अमित पुणेश्वर कोवे (वय १९, रा. चिखली, ता. मूल, जि. चंद्रपूर), विकास तुळशीराम कळसकर (वय २१, रा. चिखली, ता. मूल, जि. चंद्रपूर) या ४ आरोपींना ताब्यात घेतले असून, यांच्यासह अकील कुरेशी (वय ४५, रा. बिनबा गेट, चंद्रपूर), रुपेश माहुरे (वय २५, रा. नवेगाव खुर्द, ता. ब्रम्हपुरी) व धनराज माहुरे (वय ४५, रा. नवेगाव खुर्द, ता. ब्रम्हपुरी) असे एकुण ०७ जणांवर महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ आणि प्राण्यांना क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंधक अधिनियम १९६० अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

ही धडक कारवाई चंद्रपूरचे पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, अप्पर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे आणि ब्रम्हपुरीचे उपविभागीय पोलीस अधिकारी दिनकर ठोसरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत ब्रम्हपुरीचे पोलीस निरीक्षक प्रमोद बानबले, पोलीस उपनिरीक्षक बालाजी चव्हाण, पोलीस हवादार अरुण पिसे, रतन लेनगुरे, मिलिंद नैताम, पोलीस शिपाई अमोल लोनबले आणि शुभम लेडांगे यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला.

# अड्याळ टेकडी येथे जीवन शिक्षण शिबीराचा समारोप




ब्रम्हपुरी/का.प्र.

दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा आत्मानुसंधान भू वैकुंठ अड्याळ टेकडी येथे ५ ते २० मे पर्यंत जीवन शिक्षण शिबिर प्रमुख मार्गदर्शक व संचालक सुबोधदादा यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. डॉ नवलाजी मुळे अध्यक्ष, सुश्री रेखाताई कार्याध्यक्षा, सुश्री लक्ष्मीताई, सुश्री गंगाताई यांनी संपूर्ण शिबिराचे बौद्धिक मार्गदर्शन व संचालन केले.

सदर शिबिरात चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, यवतमाळ, नागपूर, वर्धा, नांदेड इत्यादी जिल्ह्यातील १५० मुलामुलींनी सहभाग घेतला होता. अक्षय कुळे गुरुजी, गणेश लांजेवार, जोशेष वाढई गुरुजी, आयुष आस्वले गुरुजी, कु. शीतल भाजीपाले, कु पूजा-आरती दोनाडकर, विशाखा काजरखने, तेजस्विनी भाजीपाले, संचिता बोरकुटे, डीना मेश्राम, श्रेया चौधरी, दीक्षा वाघ या सर्व प्रशिक्षकांनी सामुदायिक ध्यान-प्रार्थना, शिवकालीन युद्धकला, ग्रामोद्योग, ग्रामगीता ग्रंथ अभ्यास आदी विषयांचे प्रशिक्षण दिले. २० मे बुधवार रोज सायंकाळी ६ ते ९.३० वाजता पर्यंत या शिबिराचा भव्य समारोपीय प्रदर्शन सोहळा संपन्न झाला.

सदर कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून वाल्मीक वैद्य गुरुजी, डॉ अनंता कुंभारे, नामदेव आस्वले गुरुजी, प्रचारिका बेबीताई काकडे, लक्ष्मण पराते गुरुजी, आनंदराव घोणमोडे, दिलीप मेश्राम सर इत्यादी मान्यवर उपस्थित होते. निरंजन ठवरे गुरुजी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पार पाडले. धनेश भाई अग्रवाल, खेमराज तिडके, राजेंद्र राऊत व सुभाष मेश्राम सहित विकास गजभे, संतोष जांभुळे, केशव हिवरकर, रामदास नखाते, मनोरमा मैंद, माधुरी चौधरी, लक्ष्मी निहारे, पद्मा भेंडारकर यांनी मोलाची मदत केली.

## विनोदिनी

देवळात कीर्तन चालू असताना एक लहान मूल मोठ्या मोठ्याने रडू लागलं म्हणून त्याची आई त्याला घेऊन उठून जाऊ लागली. हे पाहून कीर्तनकार बुवा म्हणाले,'बाई कशाला उगाच तुमच्या बाळाला घेऊन जाता. त्याच्या रडण्याचा मला बिलकुल काही त्रास होत नाही...'

त्यावर ती बाई बुवाला म्हणाली,'बुवा माझ्या बाळाच्या रडण्याचा तुम्हाला त्रास होत नसेल. पण तुमच्या पहाडी आवाजातील गाण्या,बोलण्याचा माझ्या बाळाला त्रास होतोय त्याचं काय...? तुम्ही गायला लागला की ते रडायला लागते. मग जाऊ नको तर काय करू...?

# कोसंबी खडसमारा येथील भीषण आगीत तीन भावंडांचे घर जळून खाक

## विनोद झोडगे पाटील यांचेकडून तात्काळ आर्थिक मदत



ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यातील कोसंबी खडसमारा गावात दि. २३ मे रोजी सकाळी ९ वाजताच्या सुमारास एक अत्यंत हृदयद्रावक आणि भीषण आग लागल्याची घटना घडली. येथील रहिवासी संतोष यादव निकुरे, ऋषी यादव निकुरे आणि कार्तिक यादव निकुरे या तीन भावंडांच्या घराला अचानक लागलेल्या आगीत संपूर्ण घर आणि संसारोपयोगी साहित्य जळून खाक झाले. वाऱ्याचा वेग आणि घरात झालेल्या दोन गॅस सिलिंडरच्या भीषण स्फोटामुळे आगीने रौद्ररूप धारण केले होते. गावकऱ्यांच्या तत्परतेमुळे संपूर्ण गाव थोडक्यात वाचले, मात्र निकुरे कुटुंब पूर्णपणे उघड्यावर आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी सकाळी निकुरे कुटुंबाच्या घरातून आगीच्या ज्वाला निघताना दिसल्या. परिसरात मानवी वस्ती आणि शेतशिवारे असल्याने नागरिकांमध्ये प्रचंड घबराट पसरली. घटनेच्या वेळी निकुरे कुटुंबातील सर्व सदस्य सकाळीच शेतावर गेले असल्याने सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही, परंतु आगीचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही. मागील वर्षीच या तिन्ही भावंडांना 'पंतप्रधान आवास योजना' अंतर्गत घरकुल मंजूर झाले होते. नवीन घराचे बांधकाम सुरू असल्याने हे तिन्ही कुटुंब तात्पुरते एकाच घरात राहत होते. या आगीत कुटुंबाचे अंदाजे १० लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.

घटनेची माहिती मिळताच भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेते कॉम्रेड विनोद झोडगे पाटील यांनी तात्काळ संवेदनशीलतेने पावले उचलली. त्यांनी ब्रह्मपुरीचे तहसीलदार मासळ यांच्याशी संपर्क साधून अग्निशामक दलाच्या (फायर ब्रिगेड) गाडीला पाचारण केले. कॉ. झोडगे पाटील यांनी स्वत: घटनास्थळी उपस्थित राहून गावकरी व प्रशासनाच्या मदतीने आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले. त्यांनी संकटग्रस्त निकुरे कुटुंबाला धीर देत वैयक्तिक पातळीवरून तातडीची आर्थिक मदत सुपूर्द केली. तसेच तहसील प्रशासनाला या संपूर्ण घटनेचा पंचनामा करून बाधित कुटुंबाला तात्काळ सरकारी मदत देण्याच्या सूचना केल्या.

# निरोगी आरोग्यासाठी 'योग' काळाची गरज

### - प्रा.डॉ. गिरीश शेन्डे



ब्रम्हपुरी/का.प्र.

बदलती जीवनशैली आणि वाढता मानसिक ताणतणाव यामुळे निर्माण होणाऱ्या विविध आजारांवर नियंत्रण मिळवण्यासाठी 'योग' हाच सर्वोत्तम आणि प्रभावी मार्ग आहे, असे प्रतिपादन चंद्रपूर येथील श्रीमती विमलादेवी आयुर्वेदिक महाविद्यालयाचे प्राध्यापक तथा ब्रह्मपुरी येथील प्रतिष्ठित वैद्यकीय व्यावसायिक डॉ. गिरीश शेंडे यांनी केले.

जिल्हा परिषद चंद्रपूर येथे दिनांक १८ मे २०२६ रोजी 'आयुष' (AYUSH) वैद्यकीय अधिकाऱ्यांसाठी 'Yoga in lifestyle disorders' (जीवनशैलीच्या आजारांमध्ये योगाचे महत्त्व) या विषयावर एका विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी मुख्य मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते.

आपल्या अभ्यासपूर्ण व्याख्यानात डॉ. गिरीश शेंडे यांनी उपस्थित डॉक्टरांना योगासनांचे वैज्ञानिक महत्त्व आणि मानवी शरीरावर होणारे त्याचे सकारात्मक परिणाम याविषयी सविस्तर माहिती दिली. आजच्या धावपळीच्या युगात मधुमेह, उच्च रक्तदाब (बीपी), हृदयरोग, आणि मानसिक नैराश्य यांसारखे 'लाईफस्टाईल डिसऑर्डर्स' मोठ्या प्रमाणावर वाढत आहेत. या आजारांना केवळ औषधोपचारांनी नव्हे, तर दैनंदिन जीवनात योगाची जोड देऊन कसे मूळ उपचारांसह नियंत्रित केले जाऊ शकते, याचे प्रात्यक्षिक व तांत्रिक विश्लेषण त्यांनी मांडले. 'योग केवळ शारीरिक व्यायाम नसून, ते मन आणि शरीर निरोगी ठेवण्याचे शास्त्र आहे,' यावर त्यांनी विशेष भर दिला. या विशेष सत्रामुळे जिल्हा परिषद चंद्रपूर अंतर्गत कार्यरत असलेल्या अनेक 'आयुष' डॉक्टरांच्या आणि वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या आरोग्यविषयक व क्लिनिकल ज्ञानामध्ये मोलाची भर पडली. ग्रामीण भागातील रुग्णांना उपचार देताना या ज्ञानाचा मोठा फायदा होईल, असा विश्वास व्यक्त केला.

या व्याख्यान कार्यक्रमाला जिल्हा आयुष अधिकारी डॉ. साईनाथ भोवरे यांची प्रमुख उपस्थिती होती. तथा प्रशासकीय अधिकारी, आयुष विभागाचे जिल्हा नोडल अधिकारी, तसेच जिल्ह्यातील बहुसंख्य आयुष (आयुर्वेद, होमिओपॅथी, युनानी) वैद्यकीय अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

# भाजपची शहर महिला कार्यकारिणी जाहीर

ब्रम्हपुरी/का.प्र.

भारतीय जनता पार्टी चंद्रपूर ग्रामीणचे अध्यक्ष हरीशजी शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच ब्रम्हपुरी विधानसभेचे माजी आमदार प्रा.अतुलजी देशकर यांच्या सहमतीने भारतीय जनता पार्टी ब्रह्मपुरी शहर महिला मोर्चा कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली आहे.भाजपा ब्रह्मपुरी शहराध्यक्ष प्रा. सुयोगकुमार बाळबुधे यांनी नव्याने नियुक्त पदाधिकाऱ्यांची घोषणा केली.

त्यामध्ये खालीलप्रमाणे जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या आहेत अध्यक्ष : वर्षा जगदीश चौधरी, उपाध्यक्ष : डॉ. हेमलता अरविंद नंदुरकर, उपाध्यक्ष : चेतना राजेश येवले, महामंत्री : रत्ना दंडवते, सचिव : वर्षा जोशी, कोषाध्यक्ष : सूर्यकांता गेडाम, सदस्य : पुष्पा गराडे, विभा सुभेदार, नलिनी बगमारे, प्रतिभा भोयर, रेखा कामडी, गीता गोनाडे, सरिता गायकवाड, वर्षा सहारे व गीता जांभुळे यांचा समावेश आहे. यावेळी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

# ई-फार्मसी विरोधात औषध विक्रेत्यांचा कडकडीत बंद

ब्रम्हपुरी/का.प्र.

अखिल भारतीय औषध विक्रेता संघटनेने बेकायदेशीर ऑनलाईन औषध विक्री तसेच कॉर्पोरेटरव्दारे अव्यावसायीक स्पर्धे विरोधात २० मे रोजी बंद पुकारण्यात आलेल्या देशव्यापी आंदोलनाला ब्रम्हपुरी शहर व तालुक्यातील मेडिकल असोसिएशनने जाहीर पाठिंबा देत कडकडीत बंद पाळला.




शहरातील सर्वच मेडिकल दुकानदारांनी या बंदमध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. सकाळपासूनच सर्व औषधांची दुकाने कडकडीत बंद ठेवण्यात आली होती. ऑनलाईन औषध विक्रीच्या माध्यमातून ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ केला जात असून, यामुळे किरकोळ औषध विक्रेत्यांवर उपासमारीची वेळ आली आहे, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. आंदोलन काळ्या फिती लावून करण्यात आले. आंदोलना दरम्यान नागरिकांच्या अत्यावश्यक औषध सेवेची कोणतीही गैरसोय होऊ नये याची विषेस काळजी घेण्यात आली. संपूर्ण आंदोलन शिस्तबद्ध व शांततेने पार पडले. संघटनेच्या प्रतिनिधीने सांगितले की, आमच्या मागण्यांकडे शासनाने तातडीने लक्ष द्यावे व केमिस्ट बांधवावरील अन्याय दूर करून औषध व्यवसाय सुलभ व सुरक्षित करावा, ही आमची प्रमुख अपेक्षा आहे.

ब्रम्हपुरी समाचारच्या अंकाकरीता
www.bramhapuri samachar.com/bs
या ऑनलाईन साईटला भेट द्या
बातम्यांकरीता संपर्क :
मो. 9503100964
मो. 8275715315

# ब्रम्हपुरीत डिझेलचा कृत्रिम तुटवडा! मृग नक्षत्राच्या तोंडावर शेतकरी अडचणीत

## पंपधारकांकडून ६०० रुपयांच्या ऑईल खरेदीची सक्ती

ब्रह्मपुरी/का.प्र.

काही दिवसांतच मृग नक्षत्राला सुरुवात होणार असून, तालुक्यातील बळीराजा शेतीच्या मशागतीची कामे आटोपण्याच्या घाईत आहे. मात्र, नेमक्या याच मोक्याच्या क्षणी ब्रह्मपुरी तालुक्यात डिझेलचा तुटवडा निर्माण झाला आहे. डिझेल अभावी ऐन पेरणीपूर्व मशागतीची कामे खोळंबली असून, शेतकरी हवालदिल झाला आहे. त्यातच पेट्रोल पंप चालकांच्या मनमानी कारभारामुळे शेतकऱ्यांची आर्थिक लूट होत असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे.

मृग नक्षत्र लागण्यापूर्वी शेत तयार ठेवण्यासाठी ट्रॅक्टरच्या माध्यमातून मशागतीला वेग आला आहे. मात्र, तालुक्यात डिझेलचा तुटवडा असल्याने शेतकऱ्यांना इंधनासाठी वणवण भटकावे लागत आहे. ज्या पंपांवर डिझेल उपलब्ध आहे, तिथे शेतकरी आणि ट्रॅक्टर चालकांनी डिझेल खरेदीसाठी कॅन घेऊन लांबच लांब रांगा लावल्या आहेत. तासनतास रांगेत उभे राहूनही डिझेल मिळेल की नाही, अशी चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे. या टंचाईचा थेट फायदा घेत ब्रह्मपुरी तालुक्यातील एका पेट्रोल पंप चालकांने ग्राहकांची अडवणूक सुरू केली आहे. डिझेल खरेदीसाठी आलेल्या शेतकऱ्यांना ५ हजार रुपयांचे डिझेल खरेदी केल्यानंतर ६०० रुपयांचे ऑईल खरेदी करण्याची सक्ती केली जात आहे. 'ऑईल घेतले तरच डिझेल मिळेल,' अशी भूमिका पंप चालकांने घेतल्यामुळे ट्रॅक्टर मालक आणि शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. खरीप हंगाम सुरू होण्यापूर्वीच शेतकऱ्यांच्या खिशाला या सक्तीमुळे मोठी कात्री लागत आहे.

पंप चालकांच्या या मनमानीमुळे आणि डिझेलच्या टंचाईमुळे ट्रॅक्टर चालकांचा दैनंदिन खर्च वाढला आहे. परिणामी, शेतकऱ्यांना आपल्या शेतीची कामे करून घेण्यासाठी आता ट्रॅक्टरचे अतिरिक्त भाडे मोजावे लागणार आहे. आधीच बियाणे आणि खतांच्या खरेदीसाठी पैशांची जुळवाजुळव करणाऱ्या शेतकऱ्यावर आता मशागतीच्या वाढीव खर्चाचा मोठा बोजा पडणार असून, शेतकरी पुरता आर्थिक संकटात सापडला आहे.

मृग नक्षत्र सुरू व्हायच्या आधीच डिझेल टंचाईचे संकट उभे ठाकल्याने शेतकरी वर्ग चिंतेत आहे. हा डिझेलचा तुटवडा नैसर्गिक आहे की, कृत्रिम तुटवडा आहे, याची चौकशी होण्याची गरज आहे. प्रशासनाने या गंभीर समस्येकडे तात्काळ लक्ष देऊन डिझेलचा पुरवठा सुरळीत करावा आणि डिझेलच्या नावाखाली ऑईलची सक्ती करणाऱ्या मुजोर पंप चालकावर कडक कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी तालुक्यातील शेतकरी व जनतेकडून केली जात आहे.

## ३१ मे ला धम्म संमेलन व धम्मदीक्षा समारोह

ब्रह्मपुरी/का.प्र.

भारतीय बौद्ध महासभा जिल्हा शाखा चंद्रपूर पूर्व अंतर्गत तालुका शाखा ब्रह्मपुरी च्या वतीने कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर व धम्म संमेलन तथा भव्य धम्मदीक्षा समारोहाचे आयोजन दिनांक ३१ मे २०२६ रोज रविवारला धम्मभूमी खेड रोड ब्रह्मपुरी येथे करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटक इंजि. पद्माकर गणवीर राष्ट्रीय संघटक यांच्या शुभहस्ते होणार असून या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. राजपाल खोब्रागडे अध्यक्ष चंद्रपूर जिल्हा पूर्व राहणार आहेत. या कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष म्हणून भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष इंजिनिअर मोहन नंदेश्वर तर कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक डॉ. रवींद्र गवई सचिव संस्कार महाराष्ट्र राज्य तसेच धम्मदीक्षा व धम्मदेशना पूज्य स्थविर बुद्धज्योती चामोर्शी जिल्हा गडचिरोली यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून अशोक घोटेकर संघटक महाराष्ट्र राज्य, प्रा. प्रवीण कांबळे उपाध्यक्ष महानगर नागपूर, इंजिनियर भास्कर हिवराळे केंद्रीय शिक्षक माजी अध्यक्ष बुलढाणा जिल्हा हे असणार आहे.

दरम्यान सकाळी १०:०० ते सायंकाळी ५:०० वाजता कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीर, सायंकाळी ५:०० ते ७:०० वाजता धम्म संमेलन व धम्मदीक्षा समारोह होणार आहे. रात्रो ८:०० वाजता संपूर्ण महाराष्ट्रात गाजत असलेले डॉ. गायत्रीताई रामटेके यांचे 'मी रमाई बोलते' हे एकपात्री प्रयोग होणार आहे. या कार्यक्रमाला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन भारतीय बौद्ध महासभा तालुका शाखा व शहर शाखा ब्रह्मपुरी आणि समता सैनिक दल च्या वतीने करण्यात येत आहे.

## कोसंबीतील आग दुर्घटनेतील पिडीतांना तनय देशकर यांचा मदतीचा हात

ब्रम्हपुरी/का.प्र.

कोसंबी येथे शॉर्ट सर्किटमुळे भीषण आग लागून मोठी दुर्घटना घडली. आगीने काही क्षणांतच उग्र रूप धारण केल्याने दोन घरांमधील गॅस सिलेंडरचा स्फोट झाला आणि संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. या भीषण दुर्घटनेत तीन घरे पूर्णत: जळून खाक झाली असून ऋषी निकुरे, संतोष निकुरे, कार्तिक निकुरे या तीन कुटुंबांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. या दुर्घटनेत संसारोपयोगी वस्तू, कपडे, धान्य, दागिने, दुचाकी व दैनंदिन वापराचे साहित्य आगीत जळून नष्ट झाले.

या घटनेबाबत भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस तनय देशकर यांना होताच, घटनेची गांभीर्याने दखल घेत त्यांनी तात्काळ हालचाल करत अग्निशमन यंत्रणेशी संपर्क साधला व अग्निशमन दल घटनास्थळी पोहोचवण्यासाठी पुढाकार घेतला. या भीषण अग्नी तांडवात कोसंबी येथील कुटुंबाची अतोनात हानी झाली. तनय देशकर यांनी तातडीने मदतीचा निर्णय घेत भांडी, कपडे तसेच आर्थिक सहाय्य पीडित कुटुंबाना उपलब्ध करून दिले.

घटनास्थळी भाजपा युवा मोर्चाचे तालुका अध्यक्ष अविनाशजी मस्के, पुंडलिक पा. झोडे, सुधाकर झोडे यांच्या सह आदी भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी भेट घेत कुटुंबीयांची भेट घेतली व आधार दिला. यावेळी भाजपा बूथ प्रमुख तथा ग्रामपंचायत सदस्य कुमदेव लेनगुरे यांच्या सह स्थानिक नागरिक उपस्थित होते.

## स्पर्धा परीक्षा, आरक्षण, नीट घोटाळा व मतदार नोंदणीसंदर्भात ब्रम्हपुरीत काँग्रेसचे तहसिलदारांमार्फत शासनाला निवेदन




ब्रम्हपुरी/का.प्र.

राज्यातील स्पर्धा परीक्षा, सरकारी नोकरी भरती, आरक्षण धोरण, नीट परीक्षा घोटाळा तसेच मतदार पुनरिक्षण प्रक्रियेसंदर्भात काँग्रेस पक्षाच्या वतीने तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्री तथा अल्पसंख्याक विकास विभागाच्या मंत्र्यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात स्पर्धा परीक्षा व सरकारी नोकरी भरतीमध्ये राखीव प्रवर्गातील उमेदवारांबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचा पुनर्विचार करण्याची मागणी करण्यात आली. तसेच अनुसूचित जाती उपवर्गीकरणासाठी नेमलेल्या बदर समितीचा अहवाल अमान्य करावा, अशी मागणीही करण्यात आली.

नीट परीक्षेतील गैरप्रकारामुळे विद्यार्थी व पालकांना मोठा मानसिक त्रास सहन करावा लागल्याचे सांगत दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली. याशिवाय विशेष संक्षिप्त पुनरिक्षण प्रक्रियेदरम्यान 'मिसिंग' म्हणून दर्शविण्यात आलेल्या मतदारांचे फॉर्म क्रमांक ६ स्वीकारून त्यांची तात्काळ नोंदणी व मॅपिंग करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली. मतदानाचा अधिकार सुरक्षित ठेवण्यासाठी शासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी, असेही काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी निवेदनात नमूद केले. निवेदन देताना मोठ्या संख्येने काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## डॉ. तरल नागमोती यांचा ब्रम्हपुरी योग समितीकडून सत्कार

ब्रम्हपुरी/का.प्र.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रयत्नामुळे २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन जगभर साजरा केल्या जातो. या निमित्याने वर्ल्ड योगा स्पोर्ट्स फेडरेशन यांनी दिनांक १६ ते १९ मे दरम्यान क्वालालंपुर, मलेशिया येथे ११वी वर्ल्ड योगासन चैम्पियनशिप २०२६ आयोजित केली होती. या स्पर्धेत १३ देशांतील १३५ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला होता .या स्पर्धेत ब्रम्हपुरी योग समितीच्या एक सक्रिय सदस्या डॉ. तरल नागमोती व त्यांच्या दोन सहकाऱ्यांनी सहभाग घेतली होता व त्यात त्यांनी घवघवीत यश संपादन केले. ५० ते ६५ वयोगटात डॉ तरल नागमोती यांनी उत्कृष्ट कामगिरी करून सुवर्ण पदक प्राप्त केला. पूर्वा कऱ्हाडे यांनी २३ ते३० वयोगटात कांस्य पदक मिळविले तर कुंदा पाठाडे यांनी स्पर्धेत सहभाग घेतला.

या प्रसंगी राजू भागवत व भगवान कन्नाके, डॉ शेंडे, दिलीप जुमडे, सोमेश्वर राऊत, श्री कोरानकर, पाटणकर मॅडम उपस्थित होत्या.

# एका आठवड्यात पेट्रोल ७.६८ तर डिझेल ७.८० रूपयांनी महाग

## महागाईच्या आगीत सामान्य नागरिकांची होरपळ, डिझेल टंचाईने वाहतूक व शेती संकटात

ब्रम्हपुरी/का.प्र.

राज्यात आणि देशभरात इंधन दरवाढीने सर्वसामान्य नागरिकांचे कंबरडे मोडले असून, अवघ्या एका आठवड्यात पेट्रोलच्या दरात तब्बल ७.६८ रुपये तर डिझेलच्या दरात ७.८० रुपयांची वाढ झाली आहे. सतत वाढणाऱ्या इंधन दरांमुळे आधीच महागाईच्या झळा सहन करणाऱ्या सामान्य नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. पेट्रोल–डिझेलच्या वाढत्या किमतींमुळे जीवनावश्यक वस्तू, भाजीपाला, बांधकाम साहित्य, प्रवासी वाहतूक तसेच शेतीसाठी लागणाऱ्या सर्वच वस्तूंच्या दरात वाढ होत असून, त्याचा थेट परिणाम जनतेच्या खिशावर होत आहे.

सध्या बाजारातील परिस्थिती अत्यंत चिंताजनक बनली आहे. ग्रामीण भागात आधीच रोजगाराची कमतरता, शेतमालाला योग्य भाव नसणे आणि वाढत्या खर्चामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडलेला आहे. त्यातच डिझेल दरवाढीमुळे ट्रॅक्टर, पंप, मालवाहतूक आणि शेतीची मशागत यांचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. पावसाळ्याच्या तोंडावर शेतकऱ्यांना शेतीच्या कामासाठी मोठ्या प्रमाणावर डिझेलची आवश्यकता असताना वाढलेले दर




आणि निर्माण झालेली टंचाई ही अधिक चिंतेची बाब ठरत आहे.

सद्यस्थितीत अनेक पेट्रोल पंपांवर डिझेलचा पुरवठा विस्कळीत झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. काही ठिकाणी 'डिझेल उपलब्ध नाही' असे फलक लावण्यात आले असून, वाहनधारकांना तासन्तास रांगेत उभे राहावे लागत आहे. मालवाहतूक करणारे ट्रक चालक, खासगी बसचालक तसेच शेतकरी मोठ्या अडचणीत सापडले आहेत. डिझेल टंचाईमुळे बाजारात माल पोहोचण्यास विलंब होत असून, त्याचा परिणाम किरकोळ बाजारावरही जाणवत आहे. वाहतुकीचा खर्च वाढल्याने किराणा, भाजीपाला आणि दैनंदिन वापराच्या वस्तूंचे दरही वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**'सध्या डिझेलचा पुरवठा नियमित होत नसल्याने ग्राहकांमध्ये नाराजी वाढत आहे. टंचाईमुळे अनेक वाहनधारकांना रिकाम्या हाताने परत जावे लागत आहे. शासनाने यावर तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे.'**

**–प्रशांत उराडे,**
**पेट्रोल पंप चालक ब्रम्हपुरी**

दरम्यान, इंधन दरवाढीमुळे मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबांचे मासिक बजेट पूर्णपणे कोलमडले आहे. रोज कामासाठी दुचाकी वापरणाऱ्या नोकरदार वर्गाला वाढत्या पेट्रोल दरांचा मोठा फटका बसत आहे. एका बाजूला बेरोजगारी, दुसऱ्या बाजूला महागाई आणि त्यातच इंधन दरवाढ यामुळे नागरिकांमध्ये शासनाविषयी असंतोष वाढताना दिसत आहे.

# कोसंबी येथील पिडीत कुटूंबाला आम. विजय वडेट्टवार यांची आर्थिक मदत

ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यातील कोसंबी खडसमारा येथे गॅस सिलिंडर स्फोटामुळे तीन भावांची घरे जळून खाक झाल्याची दुर्दैवी घटना नुकतीच घडली आहे. या घटनेत पीडित कुटुंबांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले असून संपूर्ण गावातून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

सदर घटनेची माहिती मिळताच विधीमंडळ काँग्रेस पक्षनेते, ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय वडेट्टीवार यांनी तातडीने दखल घेत आपल्या कार्यकर्त्यांना पीडित कुटुंबीयांशी संपर्क साधण्याच्या सुचना दिल्या तसेच आपल्या स्वतः कडून आर्थिक मदत देत कुटुंबीयांना धीर दिला. संकटाच्या काळात आपण त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहोत, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

या आगीत संतोष निकुरे, कार्तिक निकुरे, रूषी निकुरे या कुटुंबियांच्या घरातील संसारोपयोगी साहित्य, धान्य, कपडे तसेच इतर महत्त्वाच्या वस्तू जळून खाक झाल्याने कुटुंबीयांवर मोठे संकट कोसळले आहे. घटनेची गंभीरता लक्षात घेता शासन स्तरावरूनही मदत मिळावी, यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे देखील आमदार विजय यांनी सांगितले आहे.

सदरची आर्थिक मदत देतांना तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके, तालुका काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस गुरुदेव वाघरे यांसह काँग्रेस कार्यकर्ते व गावकरी उपस्थित होते.

# नेवजाबाई हितकारिणी विद्यालय, नवेगांव पांडवचे शिष्यवृत्ती परीक्षेत सुयश

नागभीड/प्रतिनिधी

नागभीड तालुक्यातील नवेगांव पांडव येथील ने. हि. विद्यालयातील वर्ग ५ च्या प्राथमिक शिष्यवृत्ती परिक्षेत कु. राधीका पांडव व कु. प्रियल समर्थ यांनी प्रतिकूल परिस्थिवर मात करुन यश संपादित केले.

त्यांच्या या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा स्नेहलताताई भैया, संस्थेचे सचिव अशोकजी भैया तथा संस्थेचे सर्व पदाधिकारी, शाळेचे मुख्याध्यापक विनोद भैया तसेच सर्व शिक्षक, शिक्षिका वर्ग शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी वर्गांनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### ... QUOTES ...

**"Just one small positive thought in the morning can change your whole day."**
**- Dalai Lama**

### चा रो ळी

*एकदा तुला डोळे भरून एकटक पाहिले*
*आता तसे पाहण्याची हिंमत होत नाही...*
*नेत्रतज्ञ म्हणाले, 'नंबर खूप वाढला',*
*वारंवार नवा चष्मा मला परवडत नाही...*

★ रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल ★

# ओबीसींचे अधिकार निश्चितीसाठी जनगणनेत स्वतंत्र कॉलम आवश्यक - डॉ. कोकोडे

ब्रम्हपुरी/का.प्र.

संविधानातील ३४० व्या कलमानुसार ओबीसींचे संवैधानिक अधिकार आणि मंडल आयोगाने केलेल्या शिफारशींचा पूर्ण लाभ मिळवण्यासाठी आगामी जनगणनेत ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलम (रकाना) असणे अत्यंत आवश्यक आहे, असे स्पष्ट प्रतिपादन माजी प्राचार्य डॉ. नामदेवराव कोकोडे यांनी केले आहे. ब्रम्हपुरी येथील 'स्वागत मंगल कार्यालय' येथे आयोजित सकल ओबीसी महामोर्चाच्या एका छोटेखानी सभेत मुख्य मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. या सभेला ओबीसी समाजातील विविध जातींचे प्रमुख मान्यवर आणि लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या जनगणनेच्या प्रश्नावलीत कुटुंबप्रमुखाची जात किंवा प्रवर्ग विचारताना केवळ सामान्य वर्ग (ओपन), अनुसूचित जाती (SC) आणि अनुसूचित जमाती (ST) असे तीनच पर्याय देण्यात आले आहेत. यामध्ये ओबीसींसाठी कोणताही स्वतंत्र रकाना ठेवण्यात आलेला नाही. याचा अर्थ ओबीसींचा स्वतंत्र डाटा (आकडेवारी) जमा होणार नाही आणि परिणामी ओबीसी समाज भविष्यात विविध सोयी-सवलती व हक्कांपासून वंचित राहील, अशी भीती सभेत व्यक्त करण्यात आली. ओबीसींच्या हक्काची लढाई तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी सभेत खालील विषयांवर सविस्तर चर्चा करून त्यांची तातडीने अंमलबजावणी करण्याचे ठरविण्यात आले:

**वृत्तपत्रांद्वारे जागृती:** जनगणनेत ओबीसी कॉलमच्या मागणीसाठी वर्तमानपत्रांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर जनजागृती केली जाईल. **सोशल मिडियाचा प्रभावी वापर:** डिजिटल माध्यमांचा आणि सोशल मीडियाचा वापर करून समाजातील तरुणांपर्यंत हा संदेश पोहोचवला जाईल. **पत्रक वाटप:** आंदोलनाची भूमिका स्पष्ट करणारी माहितीपत्रके घरोघरी वितरित केली जातील. **ग्रामपंचायतींचे ठराव:** गावागावातील ग्रामपंचायतींनी 'जनगणनेत ओबीसी कॉलम नाही, म्हणून आम्ही जनगणनेवर बहिष्कार टाकत आहोत' अशा स्वरूपाचे अधिकृत ठराव मंजूर करावेत, यासाठी संबंधित सरपंच व ग्रामपंचायत सदस्यांना विनंती करण्याचे सभेत निश्चित करण्यात आले.

या सभेला ओबीसी चळवळीतील अनेक कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.


# एलएमबी पब्लिक स्कुलमध्ये 'इंटरनॅशनल ऑलम्पियाड' स्पर्धेचे बक्षीस वितरण




ब्रम्हपुरी/का.प्र.

दि. १५ एप्रिल २०२६ ला International Olympiad स्पर्धेचे बक्षिस वितरण नुकतेच करण्यात आले. या स्पर्धेमध्ये (1) English (2) Artificial Intelligence (3) Talent Hunt (4) Social Studies (SST) (5) International Informatics (6) अखिल भारतीय हिंदी (7) Stem Innovation (8) International Reasoning And Aptitude (9) Science (10) GK आदी प्रकारच्या स्पर्धेत १९९४ विदयार्थ्यांनी सहभाग घेऊन प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावून शाळेच मान उंचावलेला आहे.

एल. एम. बी. स्कुलमध्ये नेहमीच शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांचा शारिरीक मानसिक व बौध्दीक विकासासाठी विविध स्पर्धा परिक्षेचे आयोजन केल्या जाते. यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना स्कुलच्या डायरेक्टर आशिता भैया मॅडम, प्राचार्य कुरेशी सर, उपप्राचार्य राठी मॅडम, पर्यवेक्षिका झोडे मॅडम यांच्या हस्ते गोल्ड मेडल व प्रमाणपत्र देऊन विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना स्कुलच्या संचालिका यांनी 'अनुशासन' या विषयावर प्रकाश टाकला. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे एल. एम. बी. एज्युकेटर यांनी सुद्धा कौतुक करीत पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.

Miracle constructions & Developers

श्रीराम नगरी - डेव्हलपर्स

NATP प्लॉट्स उपलब्ध

- सिंदेवाही
- नवरगांव
- तळोधी
- चंद्रपुर (चोराळा)

संपर्क : अनिल दोनाडकर

मो. 8806776699, 9834946501

डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.



सोरते


प्रो.प्रा. सुरेश सोरते

मो. 8698323337

स्टेनलेस स्टील वर्क्स

गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर नागभीड रोड, ब्रम्हपुरी

रेलींग, ग्रिल व गेट स्टिलचे नावे बनवून मिळेल.






# से.नि. शिक्षक चरणदास डांगे यांचे दुःखद निधन



ब्रह्मपुरी/का.प्र.

स्थानिक टिळक नगर येथील रहिवासी, डॉ. आंबेडकर विद्यालयाचे सेवानिवृत्त शिक्षक चरणदासजी मंगरू डांगे (वय ८० वर्ष) यांचे बुधवारला सकाळी ८ वाजताच्या सुमारास अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने डांगे परिवारावर शोककळा पसरली आहे. ते पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते प्रशांत डांगे व ॲड. राजेश डांगे यांचे वडील होत.

चरणदासजी डांगे यांनी डॉ. आंबेडकर विद्यालय, ब्रम्हपुरी येथे दीर्घकाळ शिक्षक म्हणून अविरत सेवा दिली. त्यांच्या पार्थिवावर आज गुरुवार, २८ मे २०२६ अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

# इटान-कोलारी पुलाचे काम थंडबस्त्यात

ब्रम्हपुरी/का.प्र.

भंडारा व चंद्रपूर जिल्ह्यांना जोडणाऱ्या महत्त्वाकांक्षी इटान-कोलारी वैनगंगा नदीवरील मोठ्या पुलाच्या कामाबाबत आता शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि संबंधित यंत्रणेविरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. तब्बल ८५ कोटी ९९ लाख ७३ हजार ६७० रुपयांच्या या प्रकल्पाचे काम २१ जुलै २०२० रोजी सुरू झाले होते. मात्र, १८ महिन्यांत पूर्ण होणे अपेक्षित असलेले हे काम आज पाच वर्षांनंतरही पूर्णत्वास न गेल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग, भंडारा यांच्या अखत्यारितील या कामामध्ये इटान (ता. लाखांदूर, जि. भंडारा) ते कोलारी (ता. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर) रस्त्यावर वैनगंगा नदीवरील मोठा पूल, उपसा नाल्यावर मोठा पुलवजा बंधारा तसेच विर्ली (बु.) ते उपसा नाला रस्त्याचे बांधकाम व सुधारणा यांचा समावेश आहे. ई-निविदा अंतर्गत हे काम मे. सी. एस. कन्स्ट्रक्शन, नागपूर या कंत्राटदार संस्थेला देण्यात आले आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, पुलाचे काम संथ गतीने सुरू असून अनेक वेळा काम बंद अवस्थेत दिसून आले. परिणामी, लाखांदूर व ब्रम्हपुरी तालुक्यातील नागरिकांना पर्यायी मार्गाने जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. पावसाळ्यात नदीपात्र आणि परिसरातील रस्ते धोकादायक बनत असल्याने विद्यार्थ्यांसह शेतकरी, व्यापारी आणि रुग्णवाहिका सेवेलाही मोठा फटका बसत आहे. विशेष म्हणजे, बांधकाम संथगतीने सुरु असल्याचे कोट्यावधी रुपये खर्चुन पाच वर्षांनंतरही पुल रहदारी करीता सुरू झाले नाही. त्यामुळे कामाच्या गुणवत्ता नियंत्रणाबाबतही प्रश्न उपस्थित केले जात आहेत. एवढ्या मोठ्या निधीच्या कामात विलंब का झाला? कामाची मुदतवाढ कोणाच्या परवानगीने देण्यात आली? विलंबासाठी जबाबदार अधिकारी व कंत्राटदारांवर कारवाई का करण्यात आली नाही? असे सवाल आता नागरिक विचारू लागले आहेत.

# अधिकृत थांबा असूनही निलज-रूई येथे बस थांबेना

ब्रह्मपुरी/का.प्र.

तालुक्यातील निलज (रुई) बसस्थानक परिसरातील प्रवाशांसाठी महत्वाचा आहे. काही वर्षांपूर्वी सुपर बसचा अधिकृत थांबा मंजूर केला आहे. मात्र, नागपूर आणि गडचिरोली मार्गावर धावणाऱ्या अनेक सुपर बसचे चालक निलज बसस्थानकावर जाणीवपूर्वक बस न थांबवता सरळ पुढे जातात, अशी तक्रार स्थानिक नागरिकांकडून होऊ लागली आहे. परिणामी, नित्यनेमाने प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांना दररोज अडचणींचा सामना करावा लागत आहे.

तालुक्यातील निलज, रूई, पाचगाव ही तिन्ही महत्त्वाची गावे ब्रह्मपुरी आरमोरी राष्ट्रीय महामार्गालगत असल्याने प्रवाशांची सातत्याने मोठी गर्दी येथे आढळते. ही तिन्ही गावे एकत्र असून या गावांमधल अंतर शुन्य कि.मी. आहे. लोकसंख्येच्या दृष्टीने मोठी असलेल्या या गावात शाळा-कॉन्व्हेंट, महाविद्यालय, दवाखाना, किराणा दैनंदिन बाजारपेठ, विविध शासकीय कार्यालये अशा आवश्यक सेवांची उपलब्धता असल्याने दररोज मोठी वर्दळ असते. तसेच आजूबाजूच्या परिसरातील अनेक गावातील नागरिक नागपूर, गडचिरोली, ब्रम्हपुरी, आरमोरी आदी ठिकाणी जाण्यासाठी निलज (रुई) बसस्थानकाचा वापर करतात. या भागातील अनेक विद्यार्थी आरमोरी आणि ब्रह्मपुरी येथे उच्चशिक्षणासाठी दररोज प्रवास करतात. त्यामुळे विशेषतः सकाळच्या महाविद्यालयीन वेळेत विद्यार्थ्यांना तासनतास उभे राहावे लागते. काही वेळा बस न थांबल्यामुळे त्यांचे वर्ग चुकणे, परीक्षांना उशीर होणे असे प्रकार वारंवार घडत आहेत. नोकरीसाठी दररोज प्रवास करणाऱ्या नागरिकांनाही मोठा त्रास सहन करावा लागत आहे. प्रवाशांच्या म्हणण्यानुसार काही चालक मुद्दाम वेग कमी न करता थांबा बायपास करून पुढे जातात. सुपर बस चालक आणि वाहक यांच्यावर प्रशासनाने त्वरित कारवाई करावी, अशी मागणी नागरिक आणि विद्यार्थी वर्गातून होत आहे.


Lubi PUMPS-MOTORS

बुधवार बंद - दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.

सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता

गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी

रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी

फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053

Kirloskar CRI

ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान

1994 पासून आपल्या सेवेत

किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404